◢ दिनेश गुणे

**आपण डॉक्टर आहोत, त्यामुळे उपचारांव्यतिरिक्त कोणतंच काम करायचं नाही, असं डॉ. आशीष आणि कवितानं मेळघाटात काम करायला सुरुवात केली तेव्हाच ठरवलं होतं. पण आसपास असंख्य भीषण समस्यांची मालिकाच आहे, हे लक्षात आलं आणि कामाचा व्यापही वाढत गेला. गावोगावी आरोग्यविषयक जाणिवा रुजविण्यासाठी मग या जोडप्यानं शिबिरं सुरू केली. स्थानिक आदिवासी तरुणांना आधी शिकवलं. आता गावोगावी हेच तरुण 'आरोग्यदूत' म्हणून काम करतात.**



# 'कर्मग्रामा'ची समर्पणकथा...

मेळघाटातल्या लवादा नावाच्या आदिवासी गावात मी सुनील देशपांडेंच्या घरी, त्यांच्याशी गप्पा मारीत होतो. सुनील देशपांडे म्हणजे, संपूर्ण बांबू केंद्राचे प्रणेते. संपूर्ण बांबू केंद्रात बांबूपासून विविध वस्तू बनविण्याचे शिक्षण दिले जाते. या केंद्रात प्रशिक्षण घेणारे आदिवासी अगदी केसाच्या पिनपासून, दुमजली घरांपर्यंत, कोणतीही वस्तू बांबूपासून बनवितात. या केंद्रामुळे मेळघाटातील आदिवासींना जगण्याचा एक स्वाभिमानी मार्ग सापडलाय...

आदिवासींच्या गावात राहणे ही जीवनशैलीची कठोर परीक्षा असते. आपल्याविषयी त्यांच्या मनात आपलेपणा निर्माण करण्याचा संघर्ष तीव्र असतो. ती परीक्षा यशस्वीपणे पार केल्यानंतरच तिथे काम करता येते. शहरी भागातून तिथे गेलेल्या सुनील देशपांडे दाम्पत्यानं ते साधलं, तेव्हाच तिथे संपूर्ण बांबू केंद्र सुरू होऊ शकलं... देशपांडेंसारखे असेच अनेकजण मेळघाटात अशाच समर्पणवृत्तीने आदिवासींसाठी कामं करतायत. देशपांडेंशी गप्पा मारताना त्या कामांविषयी कळत गेलं आणि मला एक गम्मत वाटली.

शहरी भागात काम करणाऱ्या अनेक संस्थांमध्ये, सरकारी किंवा परदेशी अनुदाने मिळवून पोस्टरबाजी करीत प्रसिद्धीचा झोत स्वतःवर राहील एवढेच काम करणाऱ्या एनजीओंची संख्याच जास्त. त्यातही, एकाच क्षेत्रात काम करणाऱ्या एनजीओंचे, परस्परांशी हाडवैर. अगदी कायदेशीर आणि कधी हाती कायदा घेऊनही एकमेकांशी उभा दावा मांडणाऱ्या अशा संस्था, एकमेकांविषयी चांगलं बोलत नाहीत. इथे देशपांडे मला मेळघाटात काम करणाऱ्या सर्व संस्थांची माहिती देत होते... त्यांच्या कामाविषयी इतकं आदरानं बोलत होते, की जणू त्यांच्या महान कामापुढे आपण खूप लहान आहोत... अशाच सुरात सुनील देशपांडेंनी मला डॉ. आशीष सातवांविषयी सांगितलं. लवाद्यापासून पंधरा-वीस किलोमीटरवरच आशीष सातवांचे कर्मग्राम आहे, ही माहितीही दिली, आणि त्यांना भेटाच, असा सल्लाही दिला. मी हो म्हणताच, एक मोटरसायकलस्वारही सोबत दिला आणि त्या प्रजासत्ताक दिनाच्या दुपारी, मी डॉ. आशीष सातव यांच्या कर्मग्रामात थडकलो...



ग्रेड ४ चे कुपोषित बालक

ओळखीचा जुजबी उपचार पार पडला आणि आम्ही त्यांच्या इस्पितळाच्या इमारतीतील कार्यालयात



डॉ. कविता सातव रुग्ण तपासताना







डॉ. आशीष सातव यांचा सध्याचा दवाखाना

बसलो. जाड्याभरड्या खादीचा झब्बा आणि खादीचीच पँट घातलेल्या डॉ. सातवांनी खांद्यावरच्या खादीच्याच झोळीतून काही कागदपत्रं काढून बाजूच्या कपाटातील फायलीत व्यवस्थित ठेवली आणि माझ्याकडे पाहत प्रसन्न हसून त्यांनी ड्रॉवरमधील एका फायलीतील काही फोल्डर्स माझ्यासमोर ठेवले... कर्मग्रामातील वेगवेगळ्या उपक्रमांबद्दलची माहिती त्यात होती. मी कुतूहलानं ती चाळली आणि कागद माझ्या खांद्यावरच्या बॅगेत ठेवून त्यांच्याकडे बघितलं.

कशी सुरुवात करावी, याची बहुधा ते जुळवाजुळव करत होते...

'नागपूरच्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस करीत असतानाच, डॉक्टर झाल्यावर मेळघाटात आदिवासींसाठी काम करायचं असं मी ठरवलं होतं'... आशीष सातव यांच्या प्रवासाचा पट आता खुला होणार होता.

मेडिकल कॉलेजमध्ये शिकत असतानाच परदेशात उच्च शिक्षण आणि अमेरिकेत प्रॅक्टिस किंवा देशात महानगरात स्वतःचं हॉस्पिटल अशी अनेकांची स्वप्नं सुरू होतात. सरकारी नियमातून सुटण्यासाठी पदवीनंतर लाखो रुपये मोजून या स्वप्नपूर्तीची वाटचाल सुरू होते. आशीष सातव त्या पिढीपासून फार मागचे नाहीत. तरीही त्यांनी बघतलेलं स्वप्न वेगळं होतं. त्यांच्या पेहरावाशी साजेसं.

मी विचार करत होतो, तेवढ्यात ते म्हणाले, 'माझे आजोबा, वसंतराव बोम्बाटकर हे सर्वोदयी नेते होते. विनोबांचे अनुयायी. त्यामुळे लहानपणीच मी गांधी-विनोबांचं सगळं साहित्य वाचलेलं. खरा भारत खेड्यापाड्यात आहे, त्यामुळे खेड्याकडे चला ही गांधीजींची हाक तेव्हापासूनच कानात घुमत होती'... माझ्या मनातल्या शंकेचं समाधान झालं, आणि ते पुढे बोलू लागले, तसतसं माझं कुतूहल बळावत चाललं.

'मेळघाटात आदिवासींमध्ये राहायचं असेल, तर स्वतःच काही परीक्षांना सामोरं जावं लागेल, हे लक्षात आलं आणि मी सत्याचे प्रयोग



सुरू केले. इथला तीव्र उन्हाळा सोसण्याची शक्ती यावी, म्हणून एसी, कूलरच नव्हे, पंखादेखील वापरणं बंद केलं. भर थंडीत गार पाण्याची आंघोळ सुरू केली... हा विनोबांच्या कर्मयोगाचा पहिला धडा होता. स्थितप्रज्ञाची लक्षणे आपल्या अंगी रुजावीत याचा जाणीवपूर्वक प्रयोग सुरू केला होता. आपण या परीक्षेत यशस्वी झालंच पाहिजे, हे पक्कं ठरलं होतं. ही पहिली परीक्षा पार पडेपर्यंत निर्धारही पक्का होत गेला आणि त्याच काळात मेळघाटातील आदिवासींसोबत काम करणारे डॉ. प्रकाश आमटे, अभय बंग, अविनाश सावजी, डॉ. रवी कोल्हे यांच्यासारख्यांशी चर्चा झाली.

माझा निर्णय बरोबर होता, याची मला प्रत्येक चर्चेतून खात्री पटत गेली आणि १९९८ मध्ये मेडिकल कॉलेजमधली लेक्चररशिप सोडून मी मेळघाटात आलो.'

'महान' नावाच्या एका सेवाभावी संस्थेचा जन्म मेळघाटातल्या धारणी तालुक्यात झाला. डॉ. आशीष सातव यांच्या मेळघाट पर्वाची सुरुवात झाली होती... एका एमबीबीएस डॉक्टरनं धारणी तालुक्यातल्या अडीच-तीनशे घरांच्या आदिवासी गावात पहिले बिगरसरकारी इस्पितळ सुरू केले होते.

'डॉक्टर या व्यक्तीविषयी आदिवासींच्या मनात एक स्वतंत्र चित्र असते. माझी साधी राहणी, साधे कपडे आणि सरळ, सोपं बोलणं पाहून, माझ्या डॉक्टर असण्याविषयीच आदिवासींच्या मनात सुरुवातीला शंका होत्या. त्यामुळे ते पटवून देणं आवश्यक होतं, पण उपचारासाठी कुणीच फिरकत नव्हतं आणि मलाही कुणी बोलावत नव्हतं. कुलूपूर नावाच्या त्या गावात एका झोपडीतल्या इस्पितळात ओपीडी सुरू झाली, तर धारणीत चार खोल्यांच्या भाड्याच्या घरात इस्पितळ सुरू झालं. तेच आमचं घर, तिथेच बेडरुम'...

सुरुवातीचे ते दिवस आशीष सातवांच्या बोलण्यातून पुन्हा समोर उभे राहिले होते...

'एकदा मध्यरात्री एक गंभीर आजारी पेशंट सरकारी इस्पितळात दाखल झाला. त्याला हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता, पण इस्पितळात कुणी डॉक्टरच नव्हता. मग नाइलाजानं असेल, कुणीतरी मला निरोप दिला, आणि मी तिथे पोहोचलो. उपचारासाठी तिथे पुरेशी साधनंपण नव्हती. संदर्भासाठी आवश्यक पुस्तकांची लायब्ररीही नव्हती आणि मदतीसाठी कुणी माहीतगारही सोबत नव्हता. 'आपण डॉक्टरच आहोत,' हे सिद्ध करायला लावणारी पहिलीच परीक्षा अशी कठोर, अवघड होती. म्हणूनच, कुठल्याही परिस्थितीत ही परीक्षा पार पाडायचीच, असं मी ठरवलं आणि त्या रुग्णाभोवती घिरट्या घालणाऱ्या मृत्यूशी माझी झुंज सुरू झाली. या रुग्णावर उपचार केले, तर तो वाचण्याची शक्यता ९० टक्के तरी असेल आणि उपचारच केले नाहीत, तर तो



डॉ. आशीष सातव यांचा पहिला दवाखाना



मेळघाटातील आदिवासी पाडा

मरणार याची शंभर टक्के खात्री असेल, असा मी विचार केला आणि पहाटे चार वाजेपर्यंतच्या माझ्या उपचारांना अखेर यश आलं. त्याचा धोका टळला होता. मी सुटकेचा सुस्कारा टाकला...

...तेव्हापासून, या झोपडीतील इस्पितळात सुरू झालेली उपचारांची यात्रा या इमारतीत अखंड सुरू आहे.' डॉ. सातवांच्या शब्दांत फक्त समाधान ओसंडत होतं!

पुढे दोन वर्षांनी आशीष सातव यांच्या पत्नीने, डॉ. कविताने धारणीत डोळ्यांचे इस्पितळ सुरू केले. मेळघाटातल्या गरीब आदिवासींच्या उपचारांसाठी... पेशंटकडे डॉक्टरला द्यायला पैसे नाहीत आणि पेशंटला पुरेशी सेवा देण्याकरिता लागणाऱ्या उपकरणांसाठी डॉक्टरकडे पैसे नाहीत, अशी अवस्था. कधी कधी खूप निराशा यायची. आपण चुकलो, असं कविताला वाटायचं. मोतीबिंदूच्या ऑपरेशनसाठी आदिवासींकडे पैसे नसायचे. मग आणखी एक निर्णय झाला. साध्या राहणीमुळे साठलेल्या पैशातून, शस्त्रक्रियेसाठी लागणारी दुर्बीण तरी खरेदी केली. एका देणगीदाराने दिलेल्या दहा हजारांच्या देणगीतून दहा आदिवासींवर मोतीबिंदूची शस्त्रक्रिया केली आणि कवितावरही आदिवासींचा विश्वास बसला. मग पुढच्या वर्षभरात, कविताच्या पायाला अक्षरशः भिंगरी लागली. आसपासची ५० आदिवासी गावं पिंजून काढून घरोघरी जाऊन आदिवासींची नेत्रतपासणी सुरू केली. आजवर हजारांहून जास्त शस्त्रक्रिया केल्या...

'खडतर, प्रतिकूल परिस्थितीतही आपण यशस्वी होतो, तेव्हा आपलं शिक्षण सार्थ झालं, असं एक समाधान असतं. आम्हाला तेही मिळालं, आणि मित्रपरिवारही वाढत गेला...' बोलता बोलता डॉ. आशीष सहज बोलून गेले.

या काळापर्यंत, आशीष आणि कविता सातव यांच्यावर आदिवासींचा विश्वासच नव्हे, तर प्रेमही जडलं होतं. पण पैसा मात्र जमत नव्हता. महान संस्थेसाठी उटवली गावात एक हेक्टर जागा २५ वर्षांच्या भाडेकरारावर घेतली आणि 'कर्मग्राम' उभे राहिले. एका झोपडीत सुरू झालेले रुग्णालय, हळूहळू सुसज्ज होऊ लागले आणि आदिवासींच्या क्षेत्रातील काही राजकीय नेते, सरकारी अधिकारी दुखावत गेले. मानसिक छळ सुरू झाला, खोट्या तक्रारी होऊ लागल्या.

'एखादा कुणी तलवारीनं आपल्याशी लढायला आला, तर त्याच्याशी तलवारीनंच लढू नये. त्याच्यापासून बचावासाठी ढाल वापरावी,' असं विनोबा म्हणायचे. आशीष-कवितानं तेच केलं आणि विरोधाची धारच संपली.

मेळघाटातील आदिवासींमध्ये कुपोषणाचा प्रश्न गंभीर आहे. कुपोषित मुलांचा मृत्यू म्हणजे देवाचा कोप अशी आदिवासींची समजूत असते. म्हणजे, अशा मृत्यूपुढे आपले काहीच चालत नाही, हा विचारही पक्का... कुपोषणाच्या प्रश्नावर गावोगावी काम करायचं ठरलं आणि आखणी सुरू झाली. सरकारी यंत्रणांशी समन्वय सुरू केला. गावोगावी सर्वेक्षण केलं, आणि सरकारला अहवालही दिला. त्यानुसार सरकारी यंत्रणाही कामाला लागली.

आपण डॉक्टर आहोत, त्यामुळे उपचारांव्यतिरिक्त कोणतंच काम करायचं नाही, असं डॉ. आशीष आणि कवितानं मेळघाटात काम करायला सुरुवात केली तेव्हाच ठरवलं होतं. पण आसपास असंख्य भीषण समस्यांची मालिकाच आहे, हे लक्षात आलं, आणि कामाचा व्यापही वाढत गेला. गावोगावी आरोग्यविषय जाणिवा रुजविण्यासाठी मग या जोडप्यानं शिबिरं सुरू केली. स्थानिक आदिवासी तरुणांना आधी शिकवलं. आता गावोगावी हेच तरुण 'आरोग्यदूत' म्हणून काम करतात. सरकारी इस्पितळे आणि स्वयंसेवी संस्था यांनी हातात हात घालून काम केलं, तर विधायक फळं मिळतात. इथे तेच चित्र आज दिसू लागलंय. आज अनेक आदिवासींच्या घरातील सांडपाण्यातून परसदारी भाजीचे मळे फुलले आहेत... डॉक्टर आणि रुग्ण यांच्यात सुसंवाद सुरू झाला आहे, आणि मुख्य म्हणजे, आदिवासी आरोग्यदूतांची नजर असल्यामुळे, सरकारी इस्पितळांतील गलथानपणाही हळूहळू दूर होऊ लागला आहे. यातून असंख्य आदिवासी रुग्णांवरील मृत्यूचे सावट मावळत गेले आहे. कर्मग्रामातील प्रयत्नांमुळे आणि आदिवासींच्या आरोग्य शिक्षणामुळे बालमृत्यूचे, कुपोषणाचे प्रमाणही कमी झाले आहे.

आदिवासी गावांमध्ये ग्रामीण आरोग्य दूतामार्फत घरच्या घरी उपचार करण्याच्या कर्मग्रामच्या योजनेमुळे एका वर्षातच, पाच वर्षांखालील मुलांच्या मृत्यूचे प्रमाण ५६ टक्क्यांपर्यंत खाली आल्याचे सिद्ध झाले.

आज आशीष सातव यांच्याशी फोनवरून बोलणं झालं. आता कर्मग्राम स्थिरावलं आहे. त्याच्या कामाला ओळखही मिळाली आहे. वेगवेगळ्या परिषदांमध्ये डॉ. आशीष आणि कविता यांच्या अनुभवांची देवाणघेवाण सुरू झाली आहे. कुपोषण, आदिवासींच्या आरोग्य समस्यांवर 'महान' संस्थेच्या संशोधनाचा आधार घेऊन सरकारी योजनाही आखल्या जात आहेत... मेळघाटातील एका जोडप्याने स्वार्थनिरपेक्ष भावातून सुरू केलेले एक सेवाकार्य, धंदेवाईक डॉक्टरी पेशाला एक आगळा धडा देणारे ठरले आहे.

dinesh.gune@expressindia.com